श्रीमती श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित), नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, मुख्य कार्यालय, पुणे यांना मुख्य अभियंता, जलसंपदा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद अंतर्गत "सहायक कार्यकारी अभियंता" पदावर रुजू होण्याकरिता कार्यमुक्त करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.नियुक्ती-१११५/१९७९/प्र.क्र.३५७/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० डिसेंबर, २०१५.

वाचा :- १. श्रीमती श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित), नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, मुख्यालय, पुणे यांचा अर्ज, दि.३०.११.२०१५.
२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा प्रस्ताव क्र.आस्था/श्वेयोकु-सनर/प्रशा-१/७९००, दि.२२.१२.२०१५.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.०२.१२.१९९७.

प्रस्तावना :-

नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील श्रीमती श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार, श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित), नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, मुख्य कार्यालय, पुणे यांची महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा-२०१३ अन्वये जलसंपदा विभागातंर्गत "सहायक कार्यकारी अभियंता / सहाय्यक अभियंता, श्रेणी-१" गट-अ पदावरील नियुक्तीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून शिफारस करण्यात आली आहे. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.नियुक्ती-२०१५/(७३/१५)/आ(संनि), दि.१४.१२.२०१५ अन्वये श्रीमती श्वे. यो. कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित) यांची "सहायक कार्यकारी अभियंता" पदावर दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता (आदेशासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अ.क्र.७२, गु.क्र.७३) मुख्य अभियंता, जलसंपदा, औरंगाबाद विभागांतर्गत रिक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

०२. त्यास अनुसरुन श्रीमती श्वे. यो. कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार, श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित) यांनी त्यांच्या **संदर्भ-१** येथील दि.३०.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये त्यांना नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरुन दि.३१.१२.२०१५ (म.नं.) पासून कार्यमुक्त करण्याबाबत विनंती केलेली आहे. **याबाबत संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त दि.२२.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती श्वे. यो. कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार यांना नवीन नियुक्तीच्या ठिकाणी दि.०१.०१.२०१६ (म.पू.) रुजू होण्याकरिता दि.३१.१२.२०१५ (म.नं.) पासून संचालनालयाच्या सेवेतून कार्यमुक्त करण्याची शिफारस केली असून, सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-**

शासन निर्णय :-

श्रीमती श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित) यांच्या कार्यमुक्ततेपूर्वी त्यांच्याविरुद्ध विभागांतर्गत कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही. तसेच त्यांच्याकडून शासनास कोणत्याही प्रकारचे येणे नसल्याचे संचालक, नगर रचना, पुणे यांनी प्रमाणित केले असल्यामुळे श्रीमती श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित), नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, मुख्य कार्यालय, पुणे यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून जलसंपदा विभागातंर्गत "सहायक कार्यकारी अभियंता (गट-अ)" पदावर दि.०१.०१.२०१६ (म.पू.) रोजी रुजू होण्याकरिता नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील "सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित)" पदावरुन दि.३१.१२.२०१५ (म.नं.) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

०२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.०२.१२.१९९७ मधील परिच्छेद २ (ब) (१) व (२) (एक) मधील तरतुदीनुसार सदरचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक २०१५१२३०१५२४४९४४२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shriram Dattatraya Yadav

Digitally signed by Shriram Dattatraya Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=50cb0ce4cc4fe54c74f42b860354e86ec00b3b36f5f215c9f7658e611006a200, cn=Shriram Dattatraya Yadav
Date: 2015.12.30 17:28:23 +05'30'

(श्री. द. यादव)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. **(३-प्रती)**
५. मुख्य अभियंता, जलसंपदा, औरंगाबाबद विभाग, औरंगाबाद.
६. अवर सचिव, जलसंपदा विभाग / आ (संनि), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. श्रीमती श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित), नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, मुख्यालय, पुणे यांना **(संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)**
९. निवडनस्ती (नवि-३).

*****